जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, प्रभू आशीष को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., ही सी.टी.एस. क्र. १३२३, नवीन प्लॉट क्र. १३६, टी.पी.एस. II, कन्हेअन्सनुसार सुमारे ५२४.२० चौ. मीटर आणि टी.पी. रिमार्क्सनुसार ६२७ चौ. यार्ड, तसेच विद्यमान प्रॉपर्टी रजिस्टर कार्डनुसार ४६४.१० चौ. मीटर (१३२३ए) व ६०.१० चौ. मीटर (१३२३बी) मोजमापीत क्षेत्र असलेली, २५, राम मंदिर रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०००५७, मौजे विले पार्ले, तालुका अंधेरी, नोंदणी जिल्हा व उपजिल्हा मुंबई शहर व मुंबई उपनगर येथे स्थित मिळकतीची एकमेव व संपूर्ण मालक असून, त्यावरील तत्कालीन ''प्रभू आशीष'' नावाची, एकूण १७ सदस्यांची, तळमजला अधिक चार वरचे मजले असलेली इमारत, महाराष्ट्र फ्लॅट मालकी अधिनियम, १९६३ च्या कलम ११ अंतर्गत डीम्ड कन्व्हेअन्स आदेश, संदर्भ क्र. डीडीआर-३/एमयूएम/डी.सी./प्रभू-आशीष सीएचएसएल/११०४/२०२४, दिनांक ०४-०४-२०२४ तसेच सब-रजिस्ट्रार ऑफ ॲश्युरन्स यांचेकडे क्र. एमबी-१-२९४७-२०२५ ने विधिपूर्वक नोंदणीकृत झाल्यानंतर, विकास करार व मुखत्यारपत्र दिनांक २८.०७.२०२५ अन्वये मे. वृक्ष रियल्टर्स यांना विकास हक्क प्रदान केले असून, ते अनुक्रमे सब-रजिस्ट्रार ऑफ ॲश्युरन्स यांचेकडे क्र. एमबीई-१४-१३६४०/२०२५ व एमबीई-१४-१३६४१/२०२५ ने नोंदणीकृत आहेत. त्यानंतर सदर विकासकाने ०२-०४-२०२६ रोजीचा मंजुरी सूचना पत्र, संदर्भ क्र. पी-२७४८९/२०२५/के/ईडब्ल्यू/एफमी/आयओडी/१/न्यू प्राप्त करून त्यावरील तत्कालीन विद्यमान इमारत पाडलेली आहे. सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणतेही खरेदीखत, दस्तऐवज, लेखी कागदपत्र निष्पादित केलेले असलेली कोणतीही व्यक्ती/संस्था किंवा विक्री, गहाण, विश्वस्त, धारणाधिकार, ताबा, भेट, वारसा, मुक्तता, भाडेपट्टा, विकास हक्क, मार्गाधिकार किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा दावा किंवा आक्षेप असलेली अथवा त्यासंबंधी कोणतेही दस्तऐवज निष्पादित केलेले असतील, अशा सर्वांनी त्याबाबतचा दावा कागदोपत्री पुरावासह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत मला कळवावा. अन्यथा, अशा कोणत्याही व्यक्ती/संस्थेचे दावे, मागण्या, आक्षेप, अडथळे इत्यादी किंवा त्यांच्यामार्फत अथवा त्यांच्या वतीने कोणत्याही प्रकारे केलेले दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत आणि माझ्या अशिलास सदर मिळकतीचा पुनर्विकास पुढे चालू ठेवण्याचासेच त्यातून निर्माण होणाऱ्या विक्रीयोग्य सदनिकांबाबत व्यवहार करण्याचा पूर्ण अधिकार राहील.

दिनांक : २३ जुलै, २०२६

सौ. आकांक्षा व्ही. ठक्कर
अधिवक्ता
१०१, पहिला मजला, वीरेश्वर दर्शन, जी. बी. इंदुलकर मार्ग,
विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७

युनियन बँक ऑफ इंडिया, (वसई पूर्व गोखीवरे शाखा), तळमजला, मुंडापाट रेसिडेन्सी, गोखीवरे शाखा, वसई पूर्व, जि. पालघर - ४०१३०३.
संपर्क क्रमांक :- ७३५०००००१२
ईमेल आयडी :- ubin0561380@unionbankofindia.bank

कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना

संदर्भ: एडीव्ही/वसई पूर्व गोखिवरे/एनपीए/२६-२७ दिनांक: ०१.०७.२०२६
ठिकाण: वसई पूर्व,

गोखिवरे
प्रति,
१. श्री. हिरेन वसंत राजपूत (कर्जदार)
घर क्र. ५३, मु. आणि पो. दहिसर, वैतरणा, ता. वसई, पालघर-४०१३०३.
१(ए). श्री. हिरेन वसंत राजपूत (कर्जदार)
फ्लॅट क्र. ३०१, तिसरा मजला, ए विंग, साई स्वप्ना अपार्टमेंट, गाव विरार, ता. वसई, जि. पालघर.
२. श्री. किरण वसंत गायकवाड (हमीदार)
सी-११, ट्राय-गीतांजली को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, शांतिनगर-२, नांदिवली रोड, डोंबिवली-पूर्व.
महोदय/महोदया,
सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) सहवाचता कलम १३(३) अंतर्गत सूचना.
तुम्ही येथील प्रेषिती क्र. १ यांनी आमच्या **वसई पूर्व, गोखिवरे शाखे**कडून खालील पतसुविधा घेतल्या आणि समाधानकारक रित्या खाते चालविणे/थकबाकी/हप्ते/व्याजाची परतफेड करण्यास कसूर केली आहे आणि त्यामुळे इन्कम रिकग्निशन ॲण्ड प्रुडेन्शियल अकाऊंटिंग नॉर्मनुसार आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तुमचे खाते **२९/०५/२०१८** रोजीस नॉन परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. **०१/०७/२०२६** रोजीस तुमचे खाते मध्ये रु. **३०,९५,५४९.७६/- (रुपये तीस लाख त्रेचाळीस हजार सहाशे शहात्तर आणि चाळीस पैसे मात्र)** ची रक्कम तुमच्या खात्यामध्ये थकीत आहे.
वरील सदर खात्याच्या संदर्भातील तुम्ही क्र. १ कडील थकबाकी रकमेचा तपशिल खालील प्रमाणे:-

सुविधेचे प्रकार	एनपीए म्हणजेच ०१/०७/२०२६ रोजीस ची थकीत रक्कम	०१/०७/२०२६ पासून न लावलेले व्याज	दंडात्मक व्याज (सरळ)	बँकेद्वारे झालेली खर्च/प्रभार	एकूण देय ०१/०७/२०२६ नुसार
गृह कर्ज खाते क्र. ६१३८०६६५०००००१५३	रु. ३०,९५,५४९.७६/-	-	-	-	रु ३०,९५,५४९.७६/-
एकूण देय					रु. ३०,९५,५४९.७६/-

बँकेला थकीत बनणारे थकीत पैसे किंवा पैशांचा परतावा सुरक्षित करण्यासाठी **श्री. हिरेन वसंत राजपूत** यांनी **१२/०२/२०१५** रोजी दस्तावेज निष्पादित केले आहेत आणि नामाधिकार विलेख जमा करून तारण हितसंबंध निर्माण केले आहेत.

येथील खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकतीचे गहाण:
फ्लॅट क्र. ३०१, तिसरा मजला, क्षेत्र मोजमापीत सुमारे ३९.९६ चौ. मीटर बांधकाम क्षेत्र, ''ए'' विंगमधील ''साई स्वप्ना अपार्टमेंट'' नावाच्या इमारतीत, गाव विरार, ता. वसई, जि. पालघर येथे स्थित, सर्व्हे क्र. १६९, हिस्सा क्र. ९ असलेल्या जमिनीवर, विरार पूर्व, ता. वसई, जि. पालघर येथे स्थित, उपनिबंधक वसई-३ यांच्या अधिकारक्षेत्रात चे ते सर्व.
आम्ही याद्वारे सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत तुमचे संपूर्ण दायित्व निभावण्यासाठी आणि तुम्ही निष्पादित केलेल्या कर्ज दस्तावेजांच्या अटी आणि शर्तीनुसार **रु. ३०,९५,५४९.७६/- (रुपये तीस लाख त्रेचाळीस हजार सहाशे शहात्तर आणि चाळीस पैसे मात्र) ०१/०७/२०२६ रोजीस** सह एकत्रित संविदात्मक दराने पुढील व्याज आणि प्रभार ची रक्कम चुकती करण्यासाठी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) नुसार तुम्हाला बोलाविणे करीत आहोत, कसूर केल्यास, आम्हाला सदर ॲक्ट अंतर्गत दिलेल्या कोणत्याही किंवा सर्व अधिकारांचा वापर करून बँकेच्या नावे तुम्ही बनवलेल्या खालील तारणांची सक्त वसुली करणे भाग पडेल.
अधिनियमाच्या कलम १३(१३) नुसार सदर सूचनेच्या प्राप्तीनंतर तुम्हाला बँकेच्या सहमतीशिवाय वरील तारण निकाली काढणे किंवा व्यवहार करण्यापासून प्रतिबंध करण्यात येत आहे.
तुमचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात सरफैसी ॲक्टच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.
टीप: तुम्हाला यापूर्वी जारी केलेली मागणी सूचना याद्वारे मागे घेण्यात आली आहे.

आपला स्नेहांकित,
युनियन बँक ऑफ इंडिया करीता
सही/-
प्राधिकृत अधिकारी

RELIANCE Infrastructure

सभासदांना सूचना

याद्वारे सूचना देण्यांत येते की, एजीएमच्या सूचनेत मांडलेले कामकाज करण्याकरिता **रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड** ('कंपनी') च्या सभासदांची ९७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') **शुक्रवार, १४ ऑगस्ट, २०२६ रोजी स. १०.०० वा. (भाप्रवे) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'')/अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (''ओएव्हीएम'')** मार्फत होईल.
एजीएम ही सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय कंपनी अधिनियम, २०१३ आणि त्या अंतर्गत केलेले नियम आणि आणि निगम व्यवहार मंत्रालयाने जारी केलेली जनरल सर्क्युलर दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ सहवाचता सर्क्युलर दिनांक ८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२०, ५ मे, २०२०,१३ जानेवारी, २०२१, ८ डिसेंबर, २०२१, १४ डिसेंबर २०२१, ०५ मे, २०२२, २८ डिसेंबर, २०२२, २५ सप्टेंबर, २०२३ आणि १९ सप्टेंबर, २०२४ (एमसीए सर्क्युलर्स) च्या तरतुदींच्या अनुपालनांत व्हीसी/ओएव्हीएम घेतली जाईल. त्यानुसार प्रतिपत्री नियुक्तीची सुविधा एजीएमसाठी उपलब्ध नसेल.
एमसीए सर्क्युलर्स नुसार एजीएमच्या सूचनेसह वार्षिक अहवाल २०२५-२६ हा ज्यांचे ई-मेल ॲड्रेसेस कंपनी किंवा सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड/नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''डिपॉझिटरीज'') कडे नोंदवलेले आहेत त्या सभासदांना केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवण्यांत आली आहे आणि ती कंपनीची वेबसाईट www.rinfra.com आणि स्टॉक एक्सचेंजसच्या वेबसाईट म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड च्या अनुक्रमे www.bseindia.com व www.nseindia.com वर आणि केफिन टेक्नॉलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड ('केफिनटेक'), कंपनी रजिस्ट्रार ॲंड ट्रान्सफर एजंटच्या वेबसाईट www.kfintech.com वर सुध्दा उपलब्ध असेल. पुढे, वार्षिक अहवाल पाहण्यासाठी वेबलिंक्स आणि क्युआर कोड सह पत्र ज्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत नाहीत अशा सर्व सभासदांना पाठवण्यात येईल.
प्रत्यक्ष पध्दतीने शेअर्स धारण केलेले सभासद विहित प्रपत्रात त्यांचा ईमेल पत्ता नोंदविण्याकरिता त्यांच्या धारणेचा आवश्यक तपशिल आणि दस्तावेज पुरवुन कंपनी किंवा केफिनटेक कडे त्यांचे ईमेल आयडी नोंदवु शकतात जे कंपनीची वेबसाईट www.rinfra.com वरुन डाऊनलोड करता येईल आणि कोणी सभासद इलेक्ट्रॉनिक पध्दतीने शेअर्स धारण करत असल्यास ते संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स ('डीपीज') कडे ई-मेल ॲड्रेज नोंदवू/आद्यतन करु शकतात.
एजीएम घेण्याकरिता व ई-व्होटींग सुविधा पुरविण्यासाठी अधिकृत एजन्सी म्हणून कंपनीने केफिनटेक ची सेवा नियुक्त केली आहे. सभासद सोमवार, १० ऑगस्ट, २०२६ रोजी स. १०.०० वा. (भाप्रवे) पासून गुरूवार, १३ ऑगस्ट, २०२६ रोजी सं. ५.०० वा. (भाप्रवे) पर्यंत ईलेक्ट्रॉनिक पध्दतीने त्यांचे मत देऊ शकतात. रिमोट ई-व्होटींग कालावधीच्या शेवटी सुविधा निष्क्रिय केली जाईल. जे एजीएम ला उपस्थित असतील व ज्यांनी आधी त्यांचे मत दिले नसेल त्या सभासदांसाठी एजीएम मध्ये सुध्दा ई-व्होटींगची सुविधा उपलब्ध केली जाईल. ज्या सभासदांनी एजीएमच्या आधी रिमोट ई-व्होटींगने त्यांचे मत दिले असेल ते सुध्दा व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएमला उपस्थित राहू/त्यात सहभागी होऊ शकतील परंतु ते पुन्हा त्यांचे मत देण्यात हक्कदार नसतील.
शुक्रवार, ०७ ऑगस्ट, २०२६ ह्या कट ऑफ डेट रोजीस ज्यांची नावे सभासदांना नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजनी ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत (इलेक्ट्रॉनिक भागधारणा बाबत) नोंदवली असतील फक्त तेच रिमोट ई-व्होटींगची सुविधा वापरण्यास हक्कदार असतील. संयुक्त धारकांच्या बाबतीत ज्या सभासदाचे नाव कंपनीचे सभासदांचे नोंदवहीनुसार नावांच्या क्रमाने ज्यांचे नाव प्रथम धारक म्हणून दिसते त्यांना मतदानाच्या अधिकार असेल. सभासद फक्त एकाच प्रकारे मतदान करू शकतील म्हणजे एकतर रिमोट ई-व्होटींगने किंवा एजीएम मध्ये ई-व्होटींगने. **कोणीही व्यक्ती कट-ऑफ तारखे रोजीस सभासद नाही त्यांनी ही फक्त माहितीच्या उद्देशासाठी मानण्यात यावी.**
जे सभासद प्रत्यक्ष पध्दतीने शेअर्स धारण करतात किंवा ज्यांनी त्यांचे ईमेल ॲड्रेस कंपनी/डिपीकडे नोंदवले नसतील किंवा कंपनीने इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सूचना पाठवल्यानंतर कोणतीही व्यक्ती कंपनीचे शेअर्स संपादित करून कंपनीची सभासद बनली असेल आणि कट-ऑफ डेट रोजीस शेअर्स धारण करत असल्यास ते एजीएमच्या सूचनेतील प्रक्रियेनुसार लॉगीन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतात.
सभासदांनी कृपया एजीएम मध्ये हजर राहणे, रिमोट ई-व्होटींग किंवा एजीएम मध्ये ई-व्होटींग मार्फत मत देण्याशी संबंधित एजीएमच्या सूचनेत मांडलेले सर्व निर्देश काळजीपूर्वक वाचावेत.
ई-व्होटींग शी संबंधित कोणत्याही चौकशा/तक्रारी असल्यास त्या rinfra.investors@reliancegroupindia.com वर किंवा evoting@kfintech.com वर ईमेल मार्फत कळवु शकतात किंवा टोल फ्री क्र. १८०० ३०९ ४००१ वर कॉल करावा किंवा हेल्प आणि एफएक्युज ला भेट द्यावी आणि ई-व्होटिंग युजर मॅन्युअल केफिनटेक ची वेबसाईट https://evoting.kfintech.com वर डाऊनलोड सेक्शन मध्ये उपलब्ध आहे

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड साठी

ठिकाण: मुंबई परेश राठोड
दिनांक: २२ जुलै, २०२६ कंपनी सचिव
रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड
सीआयएन: एल७५१००एमएच१९२९पीएलसी००१५३०
नोंद. कार्यालय: रिलायन्स सेंटर, तळ मजला,
१९, वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१.
दू.: +९१ २२ ४३०३ १०००,
ईमेल: rinfra.investor@reliancegroupindia.com, वेबसाईट: www.rinfra.com

---

सार्वजनिक सुचना

सर्व संबंधित व्यक्ति, ज्यात बॉनाफाईड रहिवासी, पर्यावरण गट, एन जी ओ आणि इतरांना सूचित केले जाते की राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (एस ई आय ए ए) महाराष्ट्र यांनी **चेरिएट प्रापर्टीज एल.एल.पी** ला पर्यावरणीय मंजुरी दिली आहे. पत्ता: **सर्व्हे नं. ३१(बी), ३३/२, ३३/३, ६१/१, ६१/२, ६१/३, ६२/१/अ, ६२/१ब, ६२/१(पार्ट), गाव. घोट, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र.**

फाईल क्रं. एस आई ए/एम एच/इन्फ्रा/५७१९११/२०२६ अंतर्गत.

मंजुर पत्राची प्रत महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध आहे आणि ती पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या https://parivesh.nic.in या वेबसाइटवरही पाहता येईल.

मेसर्स चेरिएट प्रापर्टीज एल.एल.पी
साईटचा पत्ता:— **साई सनसिटी, सर्व्हे नं. ३१(बी), ३३/२, ३३/३, ६१/१, ६१/२, ६१/३, ६२/१/अ, ६२/१ब, ६२/१(पार्ट), गाव. घोट, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र.**
कॉर्पोरेट पत्ता: १७०१, सत्रा प्लाझा, प्लॉट क्रमांक १९ आणि २०, सेक्टर १९डी, वाशी नवी मुंबई ४००७०५.

IARC RESOLUTI ON REDEFINED

इंटरनॅशनल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कं. प्रा. लि.
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. ४०६, २रा मजला, ओखला इंडस्ट्रियल इस्टेट, फेज-III, नवी दिल्ली-११००२०. कॉर्पोरेट कार्यालय: ए-६०१, ६०२, ६०५, ६वा मजला, २१५ ऑट्रीयम, कनकिया स्पेसेस, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. सीआयएन: यु७४९९९०१२००२पीआयसी११७५२५, ई.: iarc@arc.co.in वेबसाईट www.iarc.co.in

ई-लिलाव नि विक्री करिता जाहीर सूचना (जोडपत्र-IV ए) (नियम ८(६)

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) साठी परंतुकान्वये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषत: येथील खालील नमुद कर्जदार, हमीदार आणि गहाणवटदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की, खालील नमुद तारण मालमत्ता या आरईटीसीओ-६ चे ट्रस्टी म्हणुन तिच्या क्षमतेत कार्यरत इंटरनॅशनल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी प्रायव्हेट लिमिटेड (यानंतर ''एआयआरसी'' असा उल्लेख), जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे प्लॉट क्र. २४६, २रा मजला, ओखला इंडस्ट्रियल इस्टेट, फेज-III, नवी दिल्ली-११००२०; कॉर्पोरेट कार्यालय: ए-६०१/६०२/६०५, ६वा मजला, २१५ ऑट्रीयम, कनकिया स्पेसेस, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०३३ येथे कब्जा घेतला आहे आणि ज्यांचा प्रत्यक्ष कब्जा आयएआरसीच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी (एओ) घेतला आहे, त्या आयएआरसीच्या थकबाकीच्या वसुलीक रिता **''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''कोणत्याही मदतीशिवाय''** तत्त्वाने विकण्यात येणार आहेत. विक्री वेबसाईट iarc.co.in येथे उपलब्ध ई-लिलाव प्लॅटफॉर्म मार्फत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल.

कर्जदार/सहकर्जदार/हमीदार:
श्री. जाधव ज्ञानेश्वर गोरक्ष आणि श्रीम. उगले दिक्षा प्रभाकर
मागणी सूचना: तारीख आणि रक्कम: तारीख : २३.१२.२०२४
रु. २५,७१,२२०/- (रुपये पंचवीस लाख एक्काहत्तर हजार दोनशे वीस मात्र)
स्थावर मिळकत/तारण मालमत्तेचे वर्णन: फ्लॅट क्र. ५, मजला-२, टॉवर-२, हॅप्पीनेस्ट कल्याण प्रोजेक्ट ए, सर्व्हे क्र. १/४-७, ८बी, १०, १२, १४-१८, २१-२३, ५४/६-१०, १३, १५ए, १५बी, १६-१८, ७६/१-२, ७७/४-९, कल्याण-भिवंडी रोड, गाव रांजणोली, तालुका भिवंडी, -४२१३११ (यानंतर ''तारण मालमत्ता'' असा उल्लेख) अशा गहाण मिळकतीच्या विक्रीची सूचना.

प्रत्यक्ष कब्जाची तारीख	२२.०७.२०२६ रोजीस एकूण थकबाकी	राखीव किंमत	(इअर) इसारा अनामत रक्कम
१२.०५.२०२६	रु. २८,२२,३०८/- (रुपये अठ्ठावी लाख बावीस हजार तीनशे आठ मात्र)	रु. ३०,८०,९४५/- (रुपये तीस लाख ऐंशी हजार नऊशे पंचेचाळीस मात्र)	रु. ३,०८,०९५/- (रुपये तीन लाख आठ हजार पंच्याण्णव मात्र)

बोली वाढविण्याची रक्कम
रु. १०,०००/- (रुपये दहा हजार मात्र)
तारण मालमत्तेच्या निरिक्षणाची तारीख: ०६ ऑगस्ट, २०२६ (दु. ०१ ते दु. ०२)
इअर जमा करण्याची अंतिम तारीख: २४ ऑगस्ट, २०२६ सायं. ०४.०० पर्यंत
ई-लिलावाची तारीख/वेळ: २५ ऑगस्ट, २०२६ (स. ११ ते दु. १२)

इच्छुक पक्षकार पुढील तपाशिल, स्पष्टिकरण किंवा त्यांचा अर्ज सादर करण्यासाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करु शकतात. विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींकरिता कृपया आयएआरसीची वेबसाईट www.iarc.co.in वर उपलब्ध लिंक्या संदर्भ घ्यावा. इच्छुक पक्षकार कोणत्याही मदतीसाठी श्री. शिवा गोस्वामी यांना ८८२८८४६५४४ वर आणि श्रीम. सोनी गुप्ता यांना ९१-८६५७०५८९३१ यांना संपर्क करु शकतात.
ठिकाण: दिल्ली
दिनांक : २३.०७.२०२६ **प्राधिकृत अधिकारी**

प्रपत्र क्र. १४
[नियम ३३(२) पहा]
नोंद. एडी/स्पीड पोस्ट, चिटकवुन, दस्तीद्वारे

कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २ मुंबई येथे

वित्त मंत्रालय, भारत सरकार
३रा मजला, एमटीएनएल भवन, स्टूँड रोड, कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई - ४००००५.

मागणी सूचना

द रिकव्हरी ऑफ डेब्टस ॲंड बँक्रप्ट्सी ॲक्ट, १९९३ ची कलम २५ ते २८ आणि आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टातील नियम २ अन्वये सूचना.

नि. : ७
पुढील तारीख :- १६/०७/२०२६
तारीख वाढवून : १९/०८/२०२६ पर्यंत

आर.सी. क्र. ६० सन २०२५
एचडीएफसी बँक लि. **....अर्जदार**

विरुध्द

मे. विमल पॉवरलूम्स आणि इतर. **....प्रतिवादी**

प्रति,
सीडी १ - मे. विमल पॉवरलूम्स
''शांती निकेतन'', वर्धमान नगर, कॅम्प रोड, मालेगाव ४२३२०३.
आणि तसेच येथे : शेड, प्लॉटक्र. ७, गटक्र. २५, मालेगाव-कुसुंबे धुळे रोड, मौजे द्याणे, ता. मालेगाव ४२३२०३.
आणि तसेच येथे : ३३३, सर्व्हे. क्र. ३३३/, वर्धमान नगर, संगमेश्वर.
सीडी २ - श्रीमती आरती पंकज बडजाते, ३३३, सर्व्हे. क्र. ३३३/, वर्धमान नगर, संगमेश्वर.
याद्वारे अधिसूचित करण्यांत येते की, तुमच्याकडून **ओ. ए. क्र. ६१ सन २०१७** मध्ये सन्माननिय पीठासिन अधिकारी, **कर्ज वसूली न्यायाधिकरण II मुंबई,** यांनी पारित केलेल्या आदेशाने जारी केलेल्या वसुली प्रमाणपत्रानुसार रक्कम **रु. ८२,६१,७०४.०५/- (रुपये ब्याऐंशी लाख एकसष्ट हजार सातशे चार आणि पाच पैसे मात्र)** ची रक्कम देय झाले आहेत. अर्जदारास ही रक्कम **८२,६१,७०४.०५/- (रुपये ब्याऐंशी लाख एकसष्ट हजार सातशे चार आणि पाच पैसे मात्र)** प्रलंबित व्याज, त्यावरील खर्च दिनांक **०१.०४.२०१६** पासून देयक अदा होईपर्यंत/प्रत्यक्ष वसुली होईपर्यंत आणि भविष्यातील वार्षिक @ **१२%** व्याजासह संयुक्त आणि स्वतंत्रपणे **सीडी** कडून वसुली करण्यास हक्कदार आहे.
तुम्हाला सूचना मिळाल्यापासून **१५ दिवसांच्या** आत वरील रक्कम भरण्याचे निर्देश देण्यात येत आहेत, अन्यथा कर्ज व दिवाळखोरी कायदा, १९९३ आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार वसुली केली जाईल.
वरील रकमे व्यतिरिक्त तुम्हाला खालील रकमा सुद्धा भराव्या लागतील:
(ए) प्रमाणपत्र/निष्पादन प्रक्रियेच्या ह्या सूचनेनंतर तात्काळ सुरू होणाऱ्या कालावधी साठी देय असे व्याज
(बी) ही सूचना आणि वॉरंटस् च्या बजावणीच्या व थकबाकी रकमेच्या वसुलीकरिता केलेल्या अन्य सर्व उपाययोजनांच्या संबंधात आलेले सर्व खर्च, आकार आणि परिव्यय.
तुम्हाला पुढील कार्यवाहीसाठी दिनांक **१९/०८/२०२६** रोजी **दु. ०२:३० वा.** अधोस्वाक्षरीकारांसमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात येत आहेत.
माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या **१७/०६/२०२६** रोजी दिले.

सही/-
(चेतन जे. भीमगडे)
वसुली अधिकारी
डीआरटी-२, मुंबई.

स्पिअरहेड मेटल्स ॲंड अलॉयज लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: लदाम हाऊस, सी-३३, आ यटीआय समोर, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे (पश्चिम) -४००६०४.
दू. क्र. ०२२ - ४६६२९७९७ ईमेल आयडी: compliances@ladam.in
सीआयएन क्र. यु२७१०९एमएच१९९०पीएलसी०५६०८८

व्हिडिओ कॉन्फरसिंग (व्हीसी)/
अदर ऑडिओ-व्हिज्युअल मीन्स (ओएव्हीएम) द्वारे होणारी ३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेबाबत माहिती आणि ई-मतदान माहिती

याद्वारे सूचना देण्यात येते की स्पीअरहेड मेटल्स ॲंड अलॉयज लिमिटेड ('कंपनी') च्या सदस्यांची छत्तीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') **बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ दु. १२:०० वा.** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी') आणि इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमांद्वारे ('ओएव्हीएम') आयोजित केली जाईल, जेणेकरून एजीएम बोलावण्याच्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवसायांचे व्यवहार करता येतील, जे सदस्यांना प्रसारित केले जातील. एजीएममध्ये सहभागी होण्याची प्रक्रिया एजीएमच्या सूचनेमध्ये प्रदान केली जाईल.
हे कंपनी कायदा, २०१३ आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांच्या लागू तरतुदींनुसार आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या ('एमसीए') पूर्वीच्या सामान्य परिपत्रकांच्या आणि २२ सप्टेंबर २०२५ च्या नवीनतम सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ च्या अनुषंगाने आहे. (एकत्रितपणे ''एमसीए परिपत्रके'' म्हणून संदर्भित).
एजीएम सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या आरटीएच्या वेबसाइट :**https://evoting.purvashare.com** वर देखील उपलब्ध असेल. विनंतीनुसार कंपनी भागधारकांना एजीएमची सूचनेची आणि ३१ मार्च २०२६ च्या वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत देखील प्रदान करेल.
कंपनी पूर्वा शरेजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड ('पूर्वा') द्वारे प्रदान केलेल्या प्लॅटफॉर्मद्वारे रिमोट ई-व्होटिंग सुविधा ('रिमोट ई-व्होटिंग') प्रदान करत आहे, जेणेकरून ती तिच्या सर्व सदस्यांना एजीएमची सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठावांवर मतदान करू शकेल. याव्यतिरिक्त, कंपनी एजीएम दरम्यान ई-व्होटिंग ('ई-व्होटिंग') प्रणालीद्वारे मतदान करण्याची सुविधा देखील प्रदान करत आहे.
ई-मतदान प्रणालीची आणि ई-मतदान प्रक्रियेची तपशील एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केली जाईल. ज्या सदस्यांकडे प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स आहेत किंवा ज्यांनी त्यांचा ईमेल आयडी नोंदणीकृत केलेला नाही, ते ई-मतदान प्रणालीची तपशील मिळवू शकतात आणि एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार ई-मतदान प्रणालीवर मतदान करू शकतात.
ईमेल पत्ते नोंदणी/अपडेट करण्याची पद्धत:
ज्या सदस्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता कंपनीकडे किंवा त्यांच्या डिपॉझिटरी सहभागीकडे नोंदणीकृत केलेला नाही त्यांनी त्यांचा ई-मेल पत्ता खालील पद्धतीने नोंदवावा अशी विनंती आहे
प्रत्यक्ष भागधारकांसाठी
सदस्य आवश्यक आयडी पुराव्यांसह संबंधित फॉर्म सादर करून त्यांचे ईमेल आयडी नोंदणी/त्यांची तपशील कंपनीच्या आरटीएकडे अपडेट करू शकतात
१. केवायसी अपडेटसाठी फॉर्म आयएसआर-१
२.बँक ॲंटेस्टेशन लेटरसाठी फॉर्म आयएसआर-२
३.नामांकन अपडेटसाठी फॉर्म एसएच-१३
सदस्य हे फॉर्म :**https://www.purvashare.com/faq** वरून डाउनलोड करू शकतात आणि योग्यरित्या भरलेले फॉर्म आणि आवश्यक आयडी पुराव्यांच्या प्रती कंपनीच्या आरटीएला खालील पत्त्यावर पाठवू शकतात:
पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रा. लि.
९, शिवशक्ती इंडस्ट्रियल इस्टेट, जे. आर. बोरीचा मार्ग, लोढा एक्सेलस जवळ, लोअर परळ (पूर्व), मुंबई-४०० ०११
इलेक्ट्रॉनिक भागधारकांसाठी
इलेक्ट्रॉनिक पद्धतीने शेअर्स धारण करणाऱ्या भागधारकांना त्यांचे ईमेल ॲड्रेस, परमनंट अकाउंट नंबर (पॅन) आणि बँक अकाउंट तपशील डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे नोंदणी/अपडेट करण्याची विनंती करण्यात येत आहे, जिथे त्यांचे संबंधित डिमटेरियलाइज्ड अकाउंट ठेवले जातात.
कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत सदस्य कंपनीच्या आरटीएला **evoting@purvashare.com** आणि **